# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या गुरुवार दि. २४ जून २०१० रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १२८ वी बैठक गुरुवार दि.२४ जून २०१० रोजी दुपारी ३.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. सुभाष हजारे,भा.प्र.से. | उप सभापती तथा मुख्य अधिकारी |
| २) | मा. श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ३) | मा.श्री.कमरुद्दीन मर्चंट | सदस्य |
| ४) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ५) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| ६) | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| ७) | मा.श्री.बशीर पटेल | सदस्य |
| ८) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्या |
| ९) | मा.श्री.शरद शिरीषकर | सदस्य |
| १०) | मा.श्री.सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| ११) | श्री.व्ही.जी.नायर | सदस्य |
| १२) | उपकर निर्धारक/म.न.पा. | निमंत्रक |
| १३) | श्री.पी.पी.महिषी, निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |
| १४) | श्री.ओ.बी.साहू | सह मुख्य अधिकारी |

मा. उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत करुन सचिव यांना बैठकीचे कामकाज सुरु करण्याच्या सूचना दिल्या. सचिव श्री.महिषी यांनी उपस्थित सर्व सन्मा.सदस्यांचे स्वागत करुन मा. सभापती यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

**बाब क्रमांक - १२८.१**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची दि.१८/०५/२०१० रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

मागील बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते ११ वर सादर करण्यात आले.

सचिव यांनी मागील बैठकीत मा. सदस्यांनी विचारलेल्या मुद्यांबाबतच्या कार्यपूर्ती अहवालाबाबत माहिती देताना असे सांगितले की, मा. सदस्यांच्या सूचनांप्रमाणे तळ मजल्यावर मंडळाच्या सर्व मा. सदस्यांच्या नावाचा फलक लावण्यात आला आहे. डिझॅस्टर मॅनेजमेंट बाबतचे पुस्तक अपडेट करुन त्याची प्रत सर्व मा.सदस्यांना देण्यात आली. ती पुस्तके प्रारुप नमुन्याच्या स्वरुपात छापण्यात आलेली आहेत, त्यामध्ये काही सुधारणा असल्यास त्या १५ दिवसात सुचविण्यात याव्यात, असे मा.सदस्यांना तसेच सर्व उपस्थित अधिका-यांना सुचविण्यात आले.

एम.आय.जी.क्लबच्या सदस्यत्वाबद्दल मुंबई मंडळाशी पत्रव्यवहार करण्यात आलेल्या पत्राची प्रत देण्यात आली.

कुर्ला येथील स्वॉनमिल व न्युहिंद मिल यांच्या जमीनीवर बांधण्यात येत असलेल्या संक्रमण शिबीर इमारतीच्या तळ मजल्यावर प्रत्येकी एक याप्रमाणे दोन कम्युनिटी हॉल बांधण्याबाबत एसआरडी/मुंबई मंडळ यांचेशी पत्रव्यवहार करण्यांत आलेला आहे, त्यांचेशी याबाबत चर्चा करुन तांत्रिक बाबींची पुर्तता केल्यानंतर कम्युनिटी हॉल उपलबध होणेबाबत मुंबई मंडळास निर्णय घेणे शक्य होईल.

त्यानंतर मा. सचिव यांनी अजून काही मुद्दे असल्यास त्याबाबत चर्चा करण्यांत यावी असे सुचविले.

मा.सदस्य श्री. किसन जाधव, यांनी श्री.पार्टे यांचेसंदर्भात बृहत्सूचीबाबत मुद्दा उपस्थित केला होता.श्री. मठपती, उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांनी दोन दिवसात प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल असे सांगितल्यावर मा.मुख्य अधिकारी यांनी अशी सूचना केली की, थोडा वेळ लागला तरी चालेल परंतु सदर इमारत व त्यामधील रहिवाशांची खात्री करुन सर्वसमावेशक प्रस्ताव तयार करुन लवकरात-लवकर शासनास सादर करावा. यावर मा,सदस्य किसन जाधव यांनी सांगितले की, या बाबीस विलंब होईल, परंतु सर्वांना बृहत्सूचीवर घेतले तर ही चांगलीच बाब आहे.परंतु त्यामध्ये अभिलेख शोधण्यात वेळ वाया न घालविता, आलेल्या अर्जांचा विचार करुन त्या सर्वांना बृहत्सूचीवर घेणेबाबत योग्य तो निर्णय घ्यावा.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी भाडेवसुलीकार भाडे घेण्याकरीता येत नाहीत तरी बँकेमार्फत भाडेवसुलीचे पुढे काय झाले, अशी विचारणा केली असता मुख्य लेखा अधिकारी यांनी बँकेमार्फत भाडेवसुली करण्याबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्यात आला असून सदर प्रस्ताव मंडळास प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे सांगितले.

मा.सदस्य श्री. किसन जाधव यांनी मागील बैठकीत दोन वेगवेगळया ठिकाणी असलेल्या गाळयांबाबतच्या मुद्याबाबत विचारणा केली असता मा. मुख्य अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, एका रहिवाशाच्या नांवे बाजूबाजूचे दोन गाळे असल्यास त्यांचे एकूण क्षेत्रफळ विचारात घेऊन एकच गाळा दिला जातो परंतु असे गाळे बाजूबाजूला नसतील व वेगवेगळया ठिकाणी असतील तर दोन वेगवेगळे गाळे देण्याचे प्रस्तावित आहे. हया बाबत मार्गदर्शक तत्वे शासनाच्या विचाराधीन असून याबाबत शासन निर्णय लवकरच अपेक्षित आहे.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी अशी विचारणा केली की, काही भाडेकरुंचे जास्त क्षेत्रफळ असूनही पूर्वी अशा भाडेकरुंना पुनर्रचित इमारतीत २२५ चौ.फूट किंवा १८० चौ.फूटाचे गाळे देण्यांत आले आहेत, त्यांच्या उर्वरित क्षेत्रफळाबाबत काही निर्णय घेणे शक्य आहे का ? यावर मा.मुख्य अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, ज्यांना यापूर्वी गाळे वितरण झाले आहेत, त्यांचेबाबतीत पुन्हा निर्णय घेणे शक्य नाही, परंतु ज्यांनी अद्याप पुनर्रचित इमारतीत गाळा घेतला नाही व ज्यांचे क्षेत्रफळ २५० चौ.फूट किंवा ३०० चौ.फूट आहे व ते बृहत्सूचीमध्ये समाविष्ट आहेत, अशा भाडेकरुंनी जर अर्ज केला तर त्या क्षेत्रफळाचे गाळे देणेबाबत निर्णय घेता येईल.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी एकूण किती उपकरप्राप्त इमारती आहेत,किती इमारती धोकादायक आहेत, त्यापैकी किती दुरुस्त झाल्या, किती पुनर्विकसित झाल्या याची सविस्तर माहितीची सी.डी.मा.सदस्यांना देणेबाबत विचारणा केली. त्यावर मा.सचिव यांनी सी.डी. तयार आहेत असे सांगून बैठकीत उपस्थित सर्व सदस्यांना सी.डी. देण्यांत आल्या.

मा.सदस्य श्री. किसन जाधव यांनी आणखी एक मुद्दा उपस्थित केला की, अनिवासी गाळया ऐवजी निवासी गाळा मिळण्याबाबत मांडलेल्या प्रस्तावावर काही निर्णय झाला का ? यावर पाठपुरावा होणे आवश्यक आहे. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी प्रस्ताव मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचेकडे पाठविला आहे. सदर नस्ती प्राधिकरण स्तरावर प्रलंबित आहे नस्ती प्राप्त झाल्यावर त्यावरील निर्णयाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यांत येईल, असे सांगितले.

मा.सदस्य श्री. किसन जाधव यांनी व्हेकेशन नोटीसबाबत कोणती कार्यवाही करण्यांत आली याबाबत विचारणा केली असून,यावर लवकरात-लवकर कार्यवाही होणे आवश्यक आहे असे सुचित केले, त्यावर मा.उपमुख्य अधिकारी/पु.गा. यानी सदर बुकलेट तयार करण्याचे काम सुरु असल्याचे सांगितले.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी अपघातग्रस्तांना रु.२५ लाखांची मदत करण्यासाठी जी तरतूद केली होती व धोरण ठरविले होते त्याबाबत विचारणा केली असता मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, सदर विषय प्राधिकरणाच्या बैठकीत घेण्यासाठी पाठविण्यांत आला होता. तथापि, सदर प्रस्ताव नामंजूर करण्यात आला आहे.

मा. सचिव श्री महिषी यांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्याना असे निदर्शनास आणून दिले की, नुकतेच या मंडळात परिमंडळ -१ या विभागत श्री. अरविंद ढोले, उपमुख्य अभियंता यांनी या पदाचा कार्यभार स्विकारला आहे, त्याबद्दल त्यांचे सर्वांतर्फे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यांत आले.

मा. सन्मा. सर्व सदस्यातर्फे बैठकीत श्री.मनहास, सभापती मुंबई मंडळ यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव सर्वानुमते मांडण्यात आला. मुंबई मंडळाचे मा. सभापती श्री. अमरजित सिंग मनहास हयांना निवडणुकीच्या कामासंदर्भात उल्लेखनिय कामगिरी केल्याबद्दल त्यांना डॉक्टरेट मिळाल्याबद्दल त्यांचे बैठकीत सर्वांतर्फे अभिनंदन करण्यांत आले.

मा.सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी बैठकीत असाही एक मुद्दा उपस्थित केला की, उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी साठी प्रस्ताव सादर करतेवेळी नुसते इमारतीचे क्रमांक बरोबर इमारतींची नावेही नमूद करावी, त्यावर मा. मुख्य अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, काही इमारतींचे नांवे असतात, परंतु पुष्कळ इमारतींचे जुन्या रेकॉडमध्ये क्रमांकच नमूद असतात, त्यामुळे जेथे नांवे उपलब्ध आहेत, ती यापुढे दर्शविण्यांत यावीत याची सर्वांनी नोंद घ्यावी असे त्यांनी बैठकीत उपस्थित अधिका-यांना सांगितले.

मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, उमरखाडी येथील साईकृपा , ओमकार अशा ज्या पीएमजीपी तर्फे पुनर्रचित झालेल्या इमारतींची स्थिती अत्यंत दयनीय झाली असून त्याकडे कोणीही लक्ष देत नाही. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी संबंधित कार्यकारी अभियंता श्री.हावळ यांना विचारणा केली असता त्यांनी असे स्पष्ट केले की, पीएमजीपी तर्फे बांधण्यात आलेल्या इमारतीकडून आपण कोणतेही भाडे वगैरे काहीच घेत नसून, सदर इमारतीमधील गाळे, गाळेधारकांना मालकी हक्काने वितरीत करण्यांत आल्यामुळे आपण याबाबत दुरुस्ती करु शकत नाही. यावर मा. सदस्य श्री. किसन

जाधव यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, या कारणास्तव सदर इमारतीतील गाळेधारकांना कोणीच वाली नाही का ? पीएमजीपी च्या इमारती फार जुन्या झालेल्या असल्यामुळे त्या पाडून नवीन बांधण्याबाबत क्लस्टर डेव्हलपमेंन्ट ३३ ( ९) विचार करण्यास हरकत नाही. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी प्रस्तावित ३३ (७) च्या संयुक्त पुनर्विकासाच्या धोरणामध्ये या अनुषंगाने कार्यवाही करता येईल या बाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे असे सांगितले.

मा.सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी आपल्या मंडळातर्फे ज्या इमारती पुनर्रचित करण्यांत आल्या आहेत, त्या आता जुन्या झालेल्या असून त्यांच्या देखभालीबाबत कोणता निर्णय झाला आहे, त्याचप्रमाणे हा वेगळा विभाग होता तो आपण एकत्रित केला, याबद्दल नाराजी व्यक्त केली. त्याचप्रमाणे श्री. पाटील, कार्यकारी अभियंता यांनी जातीने लक्ष घालून या इमारतींची दुरुस्ती फार चांगल्याप्रकारे करुन घेतल्याबाबत त्यांचे अभिनंदन केले.

मा. सदस्य श्री.गजेन्द्र लष्करी यांनी बैठकीत असा मुद्दा उपस्थित केला की, मागील बैठकी नंतर आजतागायत किंती इमारती पडल्या/अपघात झाले याबाबतची माहिती सभागृहास देण्यांत यावी. यावर मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी मा.मुख्य अधिकारी यांना अशी विनंती केली की, आतापर्यंत आपल्या विभागात कोठे मोठी दुघर्टना झाली नाही, ही सुर्दैवाने चांगलीच गोष्ट आहे, परंतु यापुढे अशी काही घटना घडल्यास , आपल्याकडे आर्थिक बाबीची कमतरता असल्याने याबाबत आपण मा.मुख्यमंत्री यांची भेट घेवून चर्चा करणे गरजेचे आहे.

पान क्र.२ वरील शेवटच्या परिच्छेदमध्ये नमूद केल्याप्रमाणे मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी तांबेकर स्ट्रीट/ईस्त्राईल मोहल्ला या इमारतीचे प्रॉपिंगचे काम सुरु असून प्रॉपिंगसाठी जे साहित्य वापरले जाते ते निकृष्ट दर्जाचे आहे की चांगल्या दर्जाचे आहे, याची तपासणी केली का, अशी विचारणा केली. त्यावर प्रॉपिंगसाठी वापरण्यात येणारे साहित्य हे चांगल्या दर्जाचे आहे किंवा नाही याची श्री.अरविंद ढोले, उपमुख्य अभियंता (परिमंडळ-१) यांनी तपासणी करावी असे मा.मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

त्यानंतर उपमुख्य अभियंता श्री. अरविंद ढोले यांनी त्यांचे विभागात मागील आठवडयात एक छोटीशी दुर्घटना झाल्याचे सांगितले परंतु त्यामध्ये जिवित हानी झालेली नसल्याचे नमूद केले, इतर कोणत्याही विभागात दुर्घटना झाली नसल्याचे संबंधित उपमुख्य अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी स्पष्ट केले.

सर्व सदस्यांनी मा.मुख्य अधिकारी यांचे असे निदर्शनास आणले की, सर्व सदस्यांनी मगील आठवडयात दि.१४/०६/१० रोजी धारावी येथील संक्रमण शिबिरांची पहाणी केली, त्यावेळी मंडळातील सर्व संबंधित अधिका-यांनी आम्हाला चांगले सहकार्य केले, याबद्दल सर्वांना धन्यवाद दिले. धारावी येथील संक्रमण शिबिरे उत्तम बांधल्याबाबत त्यांनी कौतुक केले. मा.श्री किसन जाधव यांनी याबाबत अशी सूचना केली की, तेथे नावांचे मोठे फलक लावण्यात यावेत. इमारतीस ओ.सी मिळाल्यानंतर तेथे बाकी सुविधांची पुर्तता करुन घ्यावी. जेणेकरुन पावसाळयात धोकादायक इमारतीपैकी एखादी इमारत कोसळल्यास तेथील रहिवाशांची तांतडीने व्यवस्था करणे शक्य होईल. असे सर्व सदस्यांनी सुचविले.

वरील सविस्तर चर्चेअंती मा.सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्ती करण्याची नोंद घेवून कार्यवृत्तांत स्थायी करण्यात आले.

**बाब क्रमांक - १२८.२**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-२ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-२ मधील (डी-१,डी-२,ग/द विभाग) १० इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. १३ ते १७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२८/१०९१**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण १० उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.२,८४,९३,९०८/-(रुपये दोन कोटी चौत्र्याऐंशी लक्ष त्र्याण्णव हजार, नऊशे आठ फक्त)एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१,७५,५६,५१३/- (रुपये एक कोटी पंच्याहत्तर लक्ष छप्पन्न हजार, पाचशे तेरा फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १२८.३**

विषय - **पुनर्विकास**
मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरीता ना हकरत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

१. भुकर पहाणी क्र.७२५, माझगाव विभाग, इ.क्र.३, डी.पी.वाडी, रामभाऊ भोगले मार्ग, मुंबई येथील **पेटीवाला चाळ** - ई विभाग

२. भुकर पहाणी क्र.२९४, गिरगाव विभाग, इ.क्र.३६-सी व ३६-सीसी तात्या घारपुरे पथ, मुघभाट क्रॉस लेन, गिरगाव, मुंबइ येथील **एकादशी स्मृती** - सी-विभाग.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. १९ ते २५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत, सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२७/१०९२**

मुंबई बेटावरील खालील २ मालमत्तांवरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१. भुकर पहाणी क्र.७२५, माझगाव विभाग, इ.क्र.३, डी.पी.वाडी, रामभाऊ भोगले मार्ग, मुंबई येथील **पेटीवाला चाळ** - ई विभाग

२. भुकर पहाणी क्र.२९४, गिरगाव विभाग, इ.क्र.३६-सी व ३६-सीसी तात्या घारपुरे पथ, मुघभाट क्रॉस लेन, गिरगाव, मुंबइ येथील **एकादशी स्मृती** - सी-विभाग.

आयत्यावेळेचे विषय

**बाब क्रमांक - १२८.३**

विषय - **पुनर्विकास**
मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरीता ना हकरत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

३. अंतिम भुखंड क्र.१३५ टी.पी.एस-४ माहीम विभाग, इमारत क्र.२४, आर.के.वैद्य रोड, दादर (प) मुंबई ४०० ०२८ " **राधाबाई कॉटेज** " - ग/उ विभाग

४. भुकर पहाणी क्र.४८ / २६, दादर नायगाव विभाग, इमारत क्र.२००, डॉ.बी.ए रोड, दादर (पु) मुंबई-१४ **दादर बिल्डींग** - फ/द विभाग

५. भुकर पहाणी क्र.१७६१- माहीम विभाग, प्लॉट क्र.५१ शिवाजी पार्क स्कीम, इमारत क्र.७४६, डॉ.एम.बी.राऊत रोड, दादर (प), मुंबई -२८ "**इंदु व्हीला**" - ग/उ विभाग

६. भुखंड पहाणी क्र.३५३- परेल शिवडी विभाग, इमारत क्र.४०-एन, भगवंतराव परळकर मार्ग परेल व्हीलेज मुंबई -१२, " **हरीभाई बिल्डींग** " - फ/द विभाग

७. अंतिम भुखंड क्र.५३४ ए /१०, माटुंगा विभाग, प्लॉट क्र.७७१-ए दादर माटुंगा इस्टेट, इमारत क्र.४, डॉ घंटी रोड पारसी कॉलनी, दादर (पु), मुंबई-१४, "**वत्सला निवास**" - फ/उ विभाग

८. अंतिम भुखंड क्र. १४९ -टी.पी.एस-३ माहीम विभाग, इमारत क्र.७७, टी.एच कटारीया मार्ग, माहीम, मुंबई-१६ "**मानेकबाई चाळ**" - ग/उ विभाग

९. भुकर पहाणी क्र.१४४४- भायखळा विभाग, इमारत क्र.५५-५९-६१-६३-६५, सुफिया झुबेर मार्ग, मुंबई -८ "**जमनादास बिल्डींग**" - ई-२ विभाग

१०. भुकर पहाणी क्र.२१७/७४- परेल शिवडी विभाग, प्लॉट क्र.२१९ **ब**, इमारत क्र.३२४-ए, जेरबाई वाडीया रोड, परेल, मुंबई -१२ "**हुसेनी हाऊस**" - फ/द विभाग

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. २७ ते ४९-ड वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत, सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२८/१०९२**

मुंबई बेटावरील खालील ८ मालमत्तांवरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

३. अंतिम भुखंड क्र.१३५ टी.पी.एस-४ माहीम विभाग, इमारत क्र.२४, आर.के.वैद्य रोड, दादर (प) मुंबई ४०० ०२८ " **राधाबाई कॉटेज** " - ग/उ विभाग

४. भुकर पहाणी क्र.४८ / २६, दादर नायगाव विभाग, इमारत क्र.२००, डॉ.बी.ए रोड, दादर (पु) मुंबई-१४ **दादर बिल्डींग** - फ/द विभाग

५. भुकर पहाणी क्र.१७६१- माहीम विभाग, प्लॉट क्र.५१ शिवाजी पार्क स्कीम, इमारत क्र.७४६,

६. भुखंड पहाणी क्र.३५३- परेल शिवडी विभाग, इमारत क्र.४०-एन, भगवंतराव परळकर मार्ग परेल व्हीलेज मुंबई -१२, " **हरीभाई बिल्डींग** " - फ/द विभाग

७. अंतिम भुखंड क्र.५३४ ए /१०, माटुंगा विभाग, प्लॉट क्र.७७१-ए दादर माटुंगा इस्टेट, इमारत क्र.४, डॉ घंटी रोड पारसी कॉलनी, दादर (पु), मुंबई-१४, "**वत्सला निवास**" - फ/उ विभाग

८. अंतिम भुखंड क्र. १४९ -टी.पी.एस-३ माहीम विभाग, इमारत क्र.७७, टी.एच कटारीया मार्ग, माहीम, मुंबई-१६ "**मानेकबाई चाळ**" - ग/उ विभाग

९. भुकर पहाणी क्र.१४४४- भायखळा विभाग, इमारत क्र.५५-५९-६१-६३-६५, सुफिया झुबेर मार्ग, मुंबई -८ "**जमनादास बिल्डींग**" - ई-२ विभाग

१०. भुकर पहाणी क्र.२१७/७४- परेल शिवडी विभाग, प्लॉट क्र.२१९ **ब**, इमारत क्र.३२४-ए, जेरबाई वाडीया रोड, परेल, मुंबई -१२ "**हुसेनी हाऊस**" - फ/द विभाग

उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

**बाब क्रमांक - १२८.४ (१)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-२ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे.
परिमंडळ-२ मधील (डी-१,डी-२,ग-दक्षिण) १९ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.५१ ते ५५ क वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२८/१०९३**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व "ब" नुसार एकूण १२ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.३,९२,१३,५८१/-(रुपये तीन कोटी ब्याण्णव लक्ष तेरा हजार पाचशे एक्याऐंशी फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.२,२८,११,०९५/- (रुपये दोन कोटी अठ्ठावीस लक्ष अकरा हजार पंच्च्याण्णव फक्त) इतक्या रक्कमेस तसेच परिशिष्ट "अ" व "ब" नुसार एकूण ०७ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.२,००,३१,४१७/-(रुपये दोन कोटी एकतीस हजार चारशे सतरा फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१,४३,७६,४९३/- (रुपये एक कोटी त्रेचाळीस लक्ष छहाहत्तर हजार चारशे त्र्याण्णव फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १२८.४ (२)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-३ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे.
परिमंडळ-३ मधील (ई-१,ई-२,फ/द विभाग) १३ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.५७ ते ६१ब वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२८/१०९४**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व "ब" नुसार एकूण १२ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.२,६६,४८,७६५/-(रुपये दोन कोटी सहासष्ट लक्ष अठ्ठेचाळीस हजार सातशे पासष्ट फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१,३८,६८,००७/- (रुपये एक कोटी अडोतीस लक्ष अडुसष्ट हजार सात फक्त) इतक्या रक्कमेस तसेच परिशिष्ट "अ" व "ब" नुसार एकूण ०१ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.२६,४५,५२४/-(रुपये सव्वीस लक्ष पंचेचाळीस हजार पाचशे चोवीस फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१५,५२,६९४/- (रुपये पंधरा लक्ष बावन्न हजार सहाशे चौ-याण्णव फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १२८.४ (३)**

विषय - उपमुख्य अभियंता परिमंडळ-४ मधील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.
परिमंडळ-४ मधील (फ/उ व ग/उ विभाग) २७ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.६३ ते ७१ वर सादर करण्यात आला.

सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२८/१०९५**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व "ब" नुसार एकूण २५ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.६,३६,७५,७७५/-(रुपये सहा कोटी छत्तीस लक्ष पंच्याहत्तर हजार सातशे पंच्याहत्तर फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.३,२०,९५,५०४/- (रुपये तीन कोटी वीस लक्ष पंच्याण्णव हजार पाचशे चार फक्त) इतक्या रक्कमेस तसेच परिशिष्ट "अ" व "ब" नुसार एकूण ०२ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.१६,५६,०५३/-(रुपये सोळा लक्ष छप्पन्न हजार त्रेपन्न फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.८,४२,३८०/- (रुपये आठ लक्ष बेचाळीस हजार तीनशे ऐंशी फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १२८.४ (४)**



विषय - उपमुख्य अभियंता परिमंडळ-१ मधील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.
परिमंडळ-१ मधील (अ,ब,सी-१/२/३ विभाग) ३१ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.७३ ते ८१ वर सादर करण्यात आला.

सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२८/१०९६**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व "ब" नुसार एकूण ३१ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.७,२५,७९,०९०/-(रुपये सात कोटी पंचवीस लक्ष एकोणऐंशी हजार नव्वद फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.४,४८,२२,०४४/- (रुपये चार कोटी अठ्ठेचाळीस लक्ष बावीस हजार चौवेचाळीस फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १२८.३**

विषय - **पुनर्विकास**
मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरीता ना हकरत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

१. भुकर पाहणी क्र. २९८२ व २९८३ भुलेश्वर विभाग, इ. क्र. ३६-४०, २२-३० आणि ६२-६४ नानुभाई देसाई मार्ग (खेतवाडी मेन रोड) व पहिली सुतार स्ट्रिट " **साखरवाला बिल्डिंग** " - **सी** विभाग

२. भुकर पहाणी क्र. ५/१८६५ भायखळा विभाग, इ. क्र. २०-२०-ए, २०-इ, आग्रीपाडा चाळ स्ट्रिट, भायखळा, मुंबई "**हवा मंझिल**"- इ विभाग

३. भुकर पहाणी क्र.१८४४ आणि १८४५ भुलेश्वर विभाग, इ.क्र.३७-३७-अे-३७-बी, ३९-४१ कॅव्हल क्रॉस लेन, मुंबई -२ "**रामवाडी**" सी-२ विभाग

**ठराव क्रमांक - १२८/१०९२**

मुंबई बेटावरील खालील ३ मालमत्तांवरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१. भुकर पाहणी क्र. २९८२ व २९८३ भुलेश्वर विभाग, इ. क्र. ३६-४०, २२-३० आणि ६२-६४ नानुभाई देसाई मार्ग (खेतवाडी मेन रोड) व पहिली सुतार स्ट्रिट " **साखरवाला बिल्डिंग** " - **सी** विभाग

२. भुकर पहाणी क्र. ५/१८६५ भायखळा विभाग, इ. क्र. २०-२०-ए, २०-इ, आग्रीपाडा चाळ स्ट्रिट, भायखळा, मुंबई "**हवा मंझिल**"- इ विभाग

३. भुकर पहाणी क्र.१८४४ आणि १८४५ भुलेश्वर विभाग, इ.क्र.३७-३७-अे-३७-बी, ३९-४१ कॅव्हल क्रॉस लेन, मुंबई -२ "**रामवाडी**" सी-२ विभाग

प्रस्तावांना मंजूरी देण्याचे व कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे एकमताने ठरले.

बैठकीच्या अखेरीस मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांनी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर केले.

सचिव तथा निवासी कार्यकारी अभियंता,
मुं.इ.दु.व पु.मंडळ

मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी,
मुं.इ.दु.व पु.मंडळ